दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.२१ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ३६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 21 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 36 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

# समाजातील तेढ महाराष्ट्राला परवडणारी नाही:कोणावरही अन्याय होऊ द्यायचा नाही

## चिंतन शिबिरात बोलताना अजित पवारांचे विधान

**नागपूर (वृत्तसंस्था)–नागपूर येथे चिंतन शिबिरात बोलताना अजित पवार म्हणाले, राज्याचे हित डोळ्यासमोर ठेऊन काम करताना कोणावर अन्याय होऊ देणार नाही. सारथी बार्टी सगळ्या संस्थांना मदत केली जाईल, असे त्यांनी म्हटले आहे. मागील दोन महिन्यापासून समाजा समाजात तेढ निर्माण केली जातेय, ही पुरोगामी महाराष्ट्राला परवडणारी नाही, असेही यावेळी अजित पवार म्हणाले.अजित पवार म्हणाले, आपल्या पक्षाला सध्या अडचणीच्या काळातून जावे लागत आहे. हेही दिवस निघून जातील. आपल्याला कोणाचे घास काढून घ्यायचे नाही आणि कोणावर अन्यायही होऊ द्यायचा नाही. जाती जातीत वाद होतील असे कुठलेही कृत्य करायचे नाही, अशा सूचना देखील पवारांनी यावेळी बोलताना दिल्या.**



सहकार मधून रोजगार कसा निर्माण करता येईल यावर काम केले जाईल. महिलांसाठी होस्टेल करण्याबाबत देखील निर्णय घेतला जाईल. निवडणुका पार पडल्यानंतर आपण जी आश्वासन देतो ती पूर्ण करणे आपले काम आहे. दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी आपण काम करत आहोत. रोजगार वाढविण्यासाठी इनोव्हेशन सेंटर इंक्युबेशन सेंटर आपण आणत आहोत. सी ट्रिपल आयटी शिक्षण याठिकाणी घेतले जाईल वर्षाला ७ हजार विद्यार्थी यातून बाहेर पडतील. टाटा ट्रस्ट यासाठी मदत करत आहे. २०० कोटी रुपयांचे प्रोजेक्ट आहे टाटा ट्रस्ट १६५ कोटी रुपये देणार आहे आणि राज्य सरकार ३५ कोटी रुपये देणार आहे. तरुणाच्या अपेक्षा पूर्ण होण्यासाठी एक थिंक टैंक तयार करत आहोत. महाराष्ट्र २०५० साठी हे काम करेल असे अजित पवार म्हणाले.पक्ष प्रवेश देताना चांगल्या माणसाला प्रवेश द्या अन्यथा आपल्याला ट्रोल केले जाते. प्रत्येकाच्या परिश्रमाचा सन्मान करणे आपले काम करावे लागेल. सुनेत्रा पवार म्हणाल्या कुणाला संधी द्यायची हे आपल्याला पहावे लागेल. सुनेत्रा पवार यांची सूचना आहे मला पाळावी लागेल. हे आधीच सांगितले असते तर आपला पक्ष कुठल्या कुठे गेला असता असे अजित पवार म्हणाले. आता आम्ही दोघे पण भाषण करत असतो. आधी माझा रात्रभर काय बोलायचे याचा गृहपाठ व्हायचा. आता देखील मी जे बोलतोय त्यावर टिक केले जात आहे.पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, आम्ही अमित शहा यांना भेटलो त्यावेळी आम्ही त्यांना सांगितले होते की जातीय द्वेष महाराष्ट्रात चालत नाही. संत तुकडोजी महाराज यांनी सांगितले आहे पक्षपात न करता काम करत राहायला हवे. हाच आपला मार्ग आहे. देशपातळीवर एखादा प्रसंग घडला तर त्यावेळी नवाब मलिक व्यवस्थित भूमिका मांडत होते. सध्या काही प्रवक्ते असे काही बोलून जातात की आगीतून उठून फुपाट्यात पडल्यागत होते. असे होऊ देऊ नका. कोणाला अंगावर घेऊ नका. पक्ष नीट सांभाळा. पक्षाची प्रतिमा चांगली कशी राहील हे पहा.अजित पवार म्हणाले, मोठी महत्वाकांक्षा ठेवायला हवी. आपल्याला पक्ष वाढवायच आहे. परिस्थितीला जुळवून घेता आले पाहिजे. तसेच उत्तरदायित्व विसरता कामा नये. यासोबत संयम, वेळेच्या बाबत कार्यतत्पर राहायला पाहिजे, पॉझिटिव्हिटी ठेवायला पाहिजे. वेळा पाळायला शिका. पुढच्या वेळी जर कोण उशिरा आले तर दार बंद केले जाईल.

## महाधरणे आंदोलनात सहभागी व्हा–विलास जोगदंड

**बीड । प्रतिनिधी**

गायरान धारकांच्या न्याय व हक्कांसाठी भव्य महाधरणे आंदोलन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (–), जिल्हा बीड च्या वतीने युवा रिपाईचे प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली हे ऐतिहासिक आंदोलन शेतकऱ्यांच्या गायरान जमिनीच्या हक्कासाठी होत आहे. आणि यामध्ये हजारो शेतकरी आणि कार्यकर्ते सहभागी होणार आहे. या आंदोलनात, समाज बांधव आणि रिपब्लिकन कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहावे असे आव्हान रिपाईचे विलास जोगदंड यांनी केले आहे. एकत्र येऊन गायरान धारकांचे हक्क मिळवण्यासाठी सामूहिक आवाज उठवण्याची ही एक ऐतिहासिक आणि महत्त्वाची संधी आहे. दिनांक: २३ सप्टेंबर २०२५ वेळ: सकाळी ११:०० वाजता स्थळ: जिल्हाधिकारी कार्यालय, नगर रोड, बीड हे



आंदोलन शेतकऱ्यांच्या गायरान जमिनीच्या हक्कांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. यामध्ये शेतकऱ्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते एकत्र येणार आहेत.आंदोलनाच्या यशासाठी तुमची उपस्थिती अनिवार्य आहे!आपला सहभाग हाच आपल्या हक्कांसाठीचा आवाज आहे! चला, एकत्र येऊ आणि गायरान धारकांना न्याय मिळवून देऊ!



**बीड (प्रतिनिधी) बीड पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांना मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा पोलीस दलाचे योग प्रशिक्षक डॉ.संजय तांदळे समवेत लक्ष्मण चाटे दिसत आहे.**

## जवळबन येथील ज्येष्ठ नागरिक अंकुश घाडगे यांचे दुखःद निधन

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जवळबन येथील ज्येष्ठ नागरिकअंकुश



दादाराव घाडगे वय ६९ वर्ष यांचे शुक्रवार रोजी उपचारा दरम्यान निधन दुःखद झाले.त्यांच्यापार्थिवावर सकाळी अकरा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,मुलगा सून, नातवंडे,मुलगी,जावई असा मोठा परिवार आहे.शांत स्वभावाचे असणारे अण्णा या नावाने सर्व परिचित होते.ते पत्रकार प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर यांचे मामा होत.त्यांच्या निधनाचे वृत्तसमजताच परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## वडाळीत मोकाट श्वानाचा धुमाकूळ

# दोन दिवसात १२ जणांना घेतला चावा

**वडाळी । लाला चव्हाण**

वडाळी शहादा तालुक्यातील वडाळी गावात गेल्या काही दिवसापासून मोकाट भटक्या श्वानानी धुमाकूळ घातला आहे . दोन दिवसात दहा तर बारा बालकासह नागरिकावर हल्ला करून चावा घेतल्याच्या घटना घडल्या यामध्ये सात जण गंभीर जखमी झाले असून इतरांना किरकोळ दुखापत झाली आहे वडाळी प्राथमिक आरोग्य केंद्रात जखमींवर प्राथमिक उपचार करण्यात आले यापैकी लावण्या गणेश माळी या



बालिकेला गंभीर दुखापत झाल्याने तिला शहादा येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिची प्रकृती ठिक आहे . रात्री अपरात्री शेकडो मोकाट श्वानाचे जथे दिसून येतात अचानक हल्या झाल्यामुळे पहाटे व रात्री चालणाऱ्या नागरिकांना कामावर जाणाऱ्याना शालेय विद्यार्थ्यांना व अंगणवाडी जाण्याच्या लहान मुलामध्ये भीतीचे वातावरण निमाण झाले आहे . गेल्या दोन दिवसात पिसाळले शवानानी केलेल्या हल्यात गावातील वाल्मीक ज्ञानेश्वर गोसावी ( ३९) सुशीलाबाई सुखदेव माळी (६५) विजय गोरख सावळे (४२) पतीक शांतीलाल पवार(९) सुशांत सुनिल माळी (१४) तसेच कुठली येथील रमेश दौलत पाटील (६५) यांच्यासह अनेकांवर हल्ला करून जखमी केले आहे . जखमींना पोलीस पाटील गजेंद्र गोसावी व ग्रामस्था च्या मदतीने वडाळी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले येथे आरोग्य वघेकीय अधिकारी डॉ निलेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सहयिक सुशील मादले आरोग्य सेविका पूनम चौधरी व अमिर वळवी यांनी प्राथमिक उपचार केले घटने बाबत ग्रामस्थां मध्ये संताप व्यक्त होत असून ग्रामपंचायत प्रशासनाने तात्काळ मोकाट श्वानाचा बंदोबस्त करावा अशी मागणी जनतेतून करण्यात येत आहे .

## ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत करा–महादेव घुले

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात नव्हे महाराष्ट्रात गेल्या आठ दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना न्याय द्यावा. सतत गेल्यात आठ दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे या पावसाने शेतकरी अडचणी सापडला आहे. पावसाने शेतात आजही पाणी साचून शेतातील पीक पूर्णपणे कुजत आहे. नदीकाठावरील शेती तर पूर्णपणे खरडून गेली आहेत. शेतकर्यांच्या तोंडचा घास निघून गेला आहे, शेतकर्यांनी जगावं कसं, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे केज तालुकाध्यक्ष महादेव घुले यांनी केली आहे. जिल्ह्यात गेल्या



आठवड्यापासून परतीच्या पावसाने हजेरी लागली आहे. या झालेल्या मुसळधार पावसाने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसामुळे शेतकर्यांचे नुकसान झाले असून शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.यामुळे शेती नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, आणि ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी होत आहे.बीड जिल्हयात अनेक ठिकाणी सोयाबीन, कांदा, बाजरी , कपासी इतर तरकारी पिकांमध्ये पाणी साठल्याने ही पिके पाण्यात बुडालेली आहेत. त्यामुळे शेतकर्यांना लाखोंचा फटका बसला आहे. मुसळधार पावसामुळे भाजीपाल्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यात अधिक भर म्हणजे बाजारपेठेमध्ये दर कोसळल्याने शेतकर्यांना पावसाचा व दरांचा असा दुहेरी फटका बसत आहे. सोयाबीन पिकामध्ये पाणी साठल्याने सोयाबीन खराब होऊन कीड लागून खराब झाली आहे. परतीच्या पावसाने खरीप हंगामावर मोठे संकट ओढवले असून शेतकरी अक्षरशः उघड्यावर आले आहेत. दरम्यान प्रशासनाने या नुकसानीचा पंचनामा करून शेतकर्यांना तात्काळ दिलासा द्यावा अशी मागणी मनसे शेतकरी सेनेचे केज तालुकाध्यक्ष महादेव घुले यांनी केली आहे.

## उटी बु ग्रामपंचायतीचा ठराव : अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत द्यावी

**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यात मागील दहा-बारा दिवसांपासून संततधार पाऊस सुरू असून यामुळे शेतकऱ्यांची मोठी बिकट अवस्था झाली आहे. यंदा पेरणीपूर्वी आणि पेरणीनंतरही झालेल्या सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. तोंडाशी आलेली पिके मुसळधार पावसाने उध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे.

याच पार्श्वभूमीवर उटी बु ग्रामपंचायतीच्या १७ सप्टेंबर रोजी झालेल्या ग्रामसभेत शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत ठराव घेण्यात आला. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमानंतर झालेल्या या ग्रामसभेत पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या ठरावासाठी हनुमंत सुरवसे यांनी सूचना मांडली तर मारुती भोजने यांनी अनुमोदन दिले.ग्रामसभेच्या ठराव क्रमांक ४ मध्ये नमूद करण्यात आले की, उटी बु ग्रामपंचायत हद्दीतील तसेच भादा मंडळ परिसरातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. खरीप हंगामात विविध पिके उध्वस्त झाली असून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती गंभीर झाली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत देणे अत्यावश्यक आहे. ठरावाची प्रत तहसीलदार, मंडळ अधिकारी भादा आणि जिल्हाधिकारी लातूर यांना पाठविण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला.तालुक्यात यावर्षी ११ मेपासूनच पावसाला सुरुवात झाली. कृतिका नक्षत्रात जोरदार पाऊस झाला, तर मृग नक्षत्रात पेरण्या झाल्यानंतरही सततच्या पावसामुळे शेतात पिकांना सूर्यकिरणांचा स्पर्शसुद्धा मिळाला नाही. परिणामी पिकांची वाढ खुंटली आणि शेतकरी चिंतेत सापडला आहे. पूर्वीप्रमाणे दोन दिवस पाऊस आणि नंतर ऊन असे चक्र न राहता यंदा सलग आठ-दहा दिवस पाऊस कोसळत असल्याने खरीप हंगाम धोक्यात आला आहे.या संकटातून शेतकऱ्यांना उभारी देण्यासाठी शासनाने तातडीने मदत करावी, अशी मागणी केवळ उटी बु ग्रामपंचायत नव्हे तर संपूर्ण औसा तालुक्यातील गावांतून होत आहे.



संपादकीय

# ‘एआय’ने बदलतेय आरोग्यसेवा

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे जगाच्या विचार करण्याच्या पद्धतीत, व्यवहारात आणि वर्तणुकीत होणारे बदल प्रत्येक क्षेत्रात अनुभवाला येत आहेत. आरोग्य व्यवस्थेच्या क्षेत्रातही यामुळे मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत, ज्यासाठी मानवी बुद्धीचा वापर करावा लागतो अशी सर्व कामे एआयकडून केली जात आहेत. एआय अशी आज्ञावली वापरतो की ज्यामुळे प्रचंड विदा (डेटा) गोळा करणे, त्याचे विश्लेषण करणे, व्यक्तीच्या वागणुकीची वारंवारिता ओळखणे, आणि यावर आधारित निर्णय घेणे ही कामे केली जातात. एआय आज्ञावली, म्हणजे अल्गोरिदमद्वारे ही कामे केली जातात.

आरोग्य व्यवस्थेत एआयचा पहिला वापर १९७०च्या सुरुवातीला सुरू झाला. २०२५मध्ये चीनमधील त्सिंघुवा विद्यापीठाच्या संशोधकांनी संपूर्ण एआय संचलित ‘एजंट हॉस्पिटल’ चीनमध्ये उभारले आहे. अर्थात, या पाठीमागे चीनचे दीर्घकालीन नियोजन आणि प्रयत्न आहेत. आरोग्य, शिक्षण आणि संशोधनामध्ये चीनने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. भविष्य काळात प्रचंड लोकसंख्येचे आरोग्यसेवेसंबंधीचे प्रश्न कसे हाताळता येतील यासंबंधीचा विचार या संशोधनामागे आहे. आभासी सिम्युलेशन म्हणजे संगणकाच्या साहाय्याने प्रत्यक्ष जीवनातील परिस्थितीचे कृत्रिम किंवा आभासी वातावरण तयार करणे होय. याचा वापर शिक्षण, प्रशिक्षण आणि कामांच्या सरावासाठी केला जातो. आरोग्य क्षेत्रात व्हर्च्युअल सिम्युलेशनचा वापर वैद्यकीय प्रशिक्षण, सर्जिकल सराव, रुग्णांचे शिक्षण आणि मानसिक आरोग्यासाठी केला जातो. ही कल्पना वापरणारे हे रुग्णालय उद्याच्या जगातील आरोग्य व्यवस्थेचे ‘ब्लू प्रिंट’ ठरेल. एआय डॉक्टर, एआय परिचारिका, रोबोटिक शल्यविशारद असलेले हे रुग्णालय एका निराळ्याच कार्यप्रणालीची जगाला प्रथमच ओळख करून देणारे असेल.

चीनच्या या ‘एजंट हॉस्पिटल’मध्ये विविध वैद्यकीय शाखातील ४२ डॉक्टर आणि चार परिचारिका आहेत. हजारो रुग्णांना काही दिवसांतच संपूर्ण निदान आणि चिकित्सा उपचार उपलब्ध करून देण्याची सुविधा या हॉस्पिटलमध्ये आहे. निदान आणि उपचार पद्धतीमधील यांची अचूकता ९३ टक्के इतकी आहे. या प्रकारे चीनमध्ये एआय साधने मोठ्या प्रमाणात वापरून डॉक्टर आणि रुग्ण या दोघांचाही वेळ आणि पैसा यात मोठ्या प्रमाणावर बचत होत आहे. सध्या आभासी जगात असलेले हे रुग्णालय वास्तव जगात संपूर्णपणे एआय संचलित रुग्णालय होऊ शकेल, अशी शक्यता यामुळे निर्माण झालेली आहे. म्हणजेच रोबो डॉक्टर आणि रोबो परिचारिका हेच रुग्णांवर उपचार करतील. कोव्हिडच्या जागतिक साथीमध्ये लक्षावधी रुग्णांना हाताळण्यासाठी डॉक्टरांची संख्या कमी पडली, हे जगाने अनुभवले आहे. अशा प्रकारची स्थिती हाताळण्याची क्षमता एआय संचलित रुग्णालयामध्ये असू शकते.आभासी निदान आणि उपचारांत ( डायग्नोसिस अँड ट्रीटमेंट ) डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून निदान विश्लेषण आणि उपचार दूरस्थ पद्धतीने देता येणे शक्य झालेले आहे. फोटो, पॅथॉलॉजी रिपोर्ट्स, लक्षणे या प्रकारे रुग्ण त्याची माहिती डिजिटल माध्यमातून (व्हिडिओ, ऑनलाइन चॅट, मेसेजिंग) देतो. एआय टूलच्या मदतीने लक्षणे तपासली जातात. या आधारावर रोगाचे प्राथमिक निदान केले जाते. यातून अधिक माहिती मिळविण्यासाठी एक्स-रे, एमआरआय काढण्यासही सुचविले जाऊ शकते. औषधांसाठी ई-प्रीस्क्रिप्शन दिले जाते. ई-मेल किंवा पद्धारे रुग्णाने कोणती काळजी घ्यायची हे सांगितले जाते. स्मार्ट वॉचद्वारे रुग्णाची निगराणी करता येते आणि व्हिडिओ सेशनद्वारे सल्ला सेवा दिली जाते. रुग्णाने आभासी भेट ठरविल्यानंतर रुग्णाची लक्षणे, पूर्व इतिहास सध्या चालू असलेली औषधे, रिपोर्ट आणि इतर आवश्यक माहिती भरल्यानंतर व्हिडिओ कॉल किंवा चॅटद्वारे प्रत्यक्ष सल्ला, सेवा दिली जाते. अवघड शस्त्रक्रियांसाठी आता रोबोटिक शल्यक्रियाही भारतातही रूढ झालेली आहे.रुग्णालय व्यवस्थापनाच्या बाबतीत एआय संचलित टूल्सचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे. रुग्ण आणि रोगांच्या संदर्भात सर्व माहिती, रुग्णाचा पूर्व इतिहास, वैद्यकीय साहित्य आणि संशोधन इत्यादी संबंधित विदा, इत्यादींचे विश्लेषण करून योग्य निदान आणि उपचार यासंबंधी डॉक्टरांना योग्य मार्गदर्शन मिळण्याची संधी कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे उपलब्ध झालेली आहे. आकस्मिक आणि अवघड असे वैद्यकीय निर्णय घेताना कोणत्या प्रकारची उपाययोजना त्वरित करावी यासंबंधी निरनिराळे अनुभवसिद्ध पर्याय एआयतर्फे सुचवले जाऊ शकतात. अतिशय गुंतागुंतीच्या आणि जटिल अशा प्रतिमा (इमेजेस) एमआरआय, एक्स रे, स्कॅन्स इत्यादी संबंधी त्वरित माहिती मिळू शकते. मानवी शरीराच्या थ्रीडी प्रतिमांमुळे शल्यक्रिया आणि वैद्यकीय उपाययोजना करता येणे आता सहज शक्य झालेले आहे. रुग्णाची माहिती गोळा करणे, त्याचे विश्लेषण आणि निदान करणे, उपचार सुचवणे यासाठी लागणाऱ्या वेळेत कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मोठ्या प्रमाणात बचत झालेली आहे. अपघात किंवा जीवनाला धोका ठरणाऱ्या आजाराच्या बाबतीत एआयमुळे डॉक्टरांना त्वरित निर्णय आणि अंमलबजावणी शक्य होते.आरोग्यव्यवस्थेतील कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करण्यासाठी ‘लार्ज लँग्वेज मॉडेलचा’ वापर करण्यात येतो. वैद्यकीय संदर्भ साहित्य, निदान पद्धतीचा शिष्टाचार (प्रोटोकॉल) आणि रुग्णांशी संवाद याबाबत मानवी भाषेवर प्रक्रिया करणे, समजून घेणे आणि भाषा निर्मिती याबाबत कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित केली जाते. वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी एजंट हॉस्पिटलसारख्या सुविधांचा वापर करता येऊ शकतो. विद्यार्थ्यांना सुरक्षित आभासी वातावरणात शस्त्रक्रिया, आपत्कालीन परिस्थिती आणि क्लिष्ट प्रक्रियांचा सराव करण्याची संधी मिळेल. यामुळे प्रत्यक्ष रुग्णांवर उपचार करण्यापूर्वी त्यांचा आत्मविश्वास वाढून चुकांची शक्यता कमी होईल.वैद्यकीय संशोधन आणि क्लिनिकल चाचण्या या वैद्यकीय उपचारांसाठी महत्त्वाच्या असतात. क्लिनिकल चाचणी म्हणजे नवीन वैद्यकीय उपचार, नवीन औषध किंवा नवीन उपकरणाची सुरक्षितता आणि परिणामकारकता याबाबत वैज्ञानिकदृष्ट्या मूल्यांकन करणे. चाचण्या करून घेण्यासाठी सध्या मानवी स्वयंसेवकांचा उपयोग केला जातो. क्लिनिकल चाचण्यांसाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक, वेळ आणि साधन सामग्रीचा मोठ्या प्रमाणावर वापर करावा लागतो. एआय टूल्समुळे या चाचण्या करण्यात सुलभता निर्माण झालेली आहे, एवढेच नव्हे तर पैसे आणि वेळेची मोठ्या प्रमाणावर बचत होत आहे.आरोग्यसेवेचा वाढता खर्च, गुणवत्तापूर्ण उपचार आणि आरोग्यसेवेपर्यंतची पोहोच (क्सेस) हे भारतातील आरोग्यसेवा क्षेत्रातील कळीचे प्रश्न आहेत. भारतासारख्या खंडप्राय देशात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराने आरोग्यसेवा दूरस्थ स्वरूपात पोहोचविणे, खर्चात बचत करणे, रुग्णावर त्वरित उपचार करणे शक्य आहे. आभासी आरोग्य सल्ला सेवा, (व्हर्चुअल कन्सल्टेशन) चॅटबॉट इत्यादी माध्यमातून पोहोचवता येऊ शकते.डिजिटल माध्यमातून सेवा प्रदान करताना जे नैतिक प्रश्न निर्माण होतात ते या डिजिटल आरोग्यसेवेच्या बाबतीतही निर्माण होतात. विशेषतः माहितीची गोपनीयता, चुकीच्या विदेचे वाटप आणि त्यातून होणारे चुकीचे निदान, रुग्णाचे अज्ञान आणि निरक्षरता इत्यादी. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आजच्या जगात मनुष्य आणि यंत्रे याचा सुयोग्य मेळ घालण्याची आवश्यकता यातून निर्माण होते. अचूक निदान आणि उपचार करणाऱ्या एजंट डॉक्टरवर संपूर्ण आरोग्य व्यवस्था सोपवायची की त्याचे सहाय्य घेऊन आरोग्य व्यवस्था अधिक कार्यक्षम, उपयुक्त, खर्च आणि वेळ वाचविणारी आणि सर्वदूर पोहोचणारी करायची, याचा निर्णय या वळणावर घेण्याची आवश्यकता आता निर्माण झाली आहे.

## हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायत अस्तित्वात नसल्याने ग्रामसभा रद्द

# पोलीस बंदोबस्तचा खर्च पोलीस बंदोबस्त देणाऱ्या व घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांकडून वसूल करण्याची विस्थापितांची मागणी

## जालीयनवाला बाग हत्याकांडची पुनरावृत्ती करायचे आहे का? विस्थापितांचा प्रशासनाला सवाल





**उरण । प्रतिनिधी**

एनएसपीटी प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा संक्रमण शिबिरात दि. १८/०९/२०२५ रोजी ग्रामसभेला पोलीस बंदोबस्त मागणाऱ्या व देणाऱ्या सर्व दोषी शासकीय कर्मचाऱ्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे कलम ५ नुसार कारवाई करणे आणि पोलीस बंदोबस्त मागणाऱ्या अधिकाऱ्या कडून बंदोबस्त खर्च वसूल करण्याची मागणी शेवा कोळीवाडा सामाजिक ग्रामविकास मंडळने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

एनएसपीटी प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा संक्रमण शिबिरातील विस्थापित संदर्भात एक गंभीर बाब सागरी पोलीस स्टेशन, मोरा, उरण हद्दीत घटना घडली आहे.दि. १८/०९/२०२५ रोजी हनुमान कोळीवाडा विस्थापित नागरिक हे झोपेतून जागे झालो असता अचानक सकाळी ९ वाजून ५० मिनीटानी पोलीस प्रशासनाच्या ७ मोठ्या पिंजरा गाड्या, अश्रूधूर व पाणी फवारणी टँकर, अनेक पोलीस व्हॅन आणि अगणित महिला/पुरुष जुनियर / सिनियर पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, पोलीस हवालदारांचा फौज फाटा हे एनएसपीटी प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा संक्रमण शिबिरात आल्याचे विस्थापितांनी बघितले .त्या पोलीस प्रशासनाच्या कृतीने एनएसपीटी प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा संक्रमण शिबिरातील विस्थापिताची अब्रू नुकसान व बदनामी झाली आहे. आणि पोलीस प्रशासनातर्फे विस्थापिताचे हत्याकांड (जालियन वाला बाग हत्याकांड) करण्याची योजना असल्याचे चित्र स्पष्ट दिसून येत होते.असा आरोप शेवा कोळीवाडा विस्थापितांनी (हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांनी )केला आहे.त्यामुळे अशा पोलीस प्रशासनाच्या कृतीने विस्थापितांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे.एनएसपीटी प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा संक्रमण शिबिरातील मंदिरात दि. १८/०९/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता विस्थापित जमले असता त्या वेळी विनोद मिंडे (क्लास ३) प्रशासक व सुरेश मोहिते ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत हनुमान कोळीवाडा यांनी मंदिरात प्रवेश केला होता. आणि सुरेश मोहिते ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामसभा चालू करतो सांगितल्यावर त्यांना उपस्थित विस्थापित यांनी आठवन करून दिली की, माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंड पीठ यांच्या समोर दि. २५/०८/२०२५ रोजी आपण लेखी माहिती दिलीत कि, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ कलम ४ चे नुसार दि. १२/०३/१९८७ रोजीचे महाराष्ट्र शासन राजपत्रा प्रमाणे हनुमान कोळीवाडा महसुली गावाचा नकाशा व शेतकरी ८८ व बिगर शेतकरी १६८ अशा एकूण २५६ भूखंड धारकांना आणि नागरी सुविधेचे हनुमान कोळीवाडा गाव नमूना नंबर ७/१२ नावाचे दस्तावेज ग्रामपंचायत हनुमान कोळीवाडा कार्यालयातील अभिलेखात उपलब्ध नाहीत. म्हणून विस्थापितानी सुरेश मोहिते ग्रामविकास अधिकारी यांना सांगितले कि, ग्रामसभा आणि ग्रामपंचायत पण नको सांगितल्या वर त्यांनी सांगितले कि शुटिंग चालू आहे विस्थापितानी म्हणणे मांडून आणि हात उंच करून बहुमत सिध्द केल्याने सुरेश मोहिते ग्रामविकास अधिकारी यांनी ग्राम सभा रद्द केली असे जाहीर केले. हे सर्व कॅमेरा शूटिंग मध्ये जतन झालेले आहे. त्यावरून सिध्द झाले कि एनएसपीटी प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा संक्रमण शिबिरात लावलेला पोलीस बंदोबस्त चूकीचा होता. म्हणून बंदोबस्त खर्च पोलीस बंदोबस्त मागणाऱ्या अधिकाऱ्याकडून वसूल करावा. अशी विस्थापितांची मागणी आहे. शासनाने काळजी पूर्वक लक्ष घालून एनएसपीटी प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा संक्रमण शिबिरात दि. १८/०९/२०२५ रोजी ग्रामसभेला पोलीस बंदोबस्त मागणाऱ्या व देणाऱ्या सर्व दोषी शासकीय कर्मचाऱ्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे कलम ५ नुसार कारवाई करावी व पोलीस बंदोबस्त मागणाऱ्या अधिकाऱ्या कडून बंदोबस्त खर्च वसूल करावा आणि पुनर्वसन फसवणुक, ठकवणूक, छळ, कट कारस्थान रचने आणि अब्रू नुकसान करणाऱ्यावर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २०१,२१२,२२७, ३३६ (१), (२), (३),३४०(१), (२), ३५२ वगैरे वगैरे नुसार एफआयआर दाखल करावेत. गेल्या ४३ वर्षात झालेल्या पुनर्वसन फसवणुक व ठकवणूकीचा आणि बोगस ग्रामपंचायतीचा सहन शीलतेचा अंत झाल्याने विस्थापितांच्या हातून कायदा सुव्यवस्था बिघडल्यास व कोणताही विचित्र प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हाधिकारी व अध्यक्ष जेएनपीए यांच्या वर राहील असा आक्रमक इशारा शेवा कोळीवाडा विस्थापित नागरिकांनी तसेच शेवा कोळीवाडा सामाजिक ग्रामविकास मंडळने प्रशासनाला दिला आहे.गेली ४० वर्षे शेवा कोळीवाडा विस्थापितांचे पुनर्वसन झालेले नाही. शिवाय या शेवा कोळीवाडा विस्थापित नागरिकांना जिथे ठेवण्यात आले त्या हनुमान कोळीवाडा गावात संपूर्ण गावाला वाळवी लागली आहे. तसेच स्थापन करण्यात आलेली ग्रामपंचायत हनुमान कोळीवाडा हे बेकायदेशीरपणे स्थापन झालेली ग्रामपंचायत असल्यामुळे हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायत अस्तित्वात आहे हे मानण्यास विस्थापित तयार नाहीत. त्यामुळे पोलीस प्रशासन व विस्थापित यांच्यात वादविवाद होत आहेत.

# रा.स्व.संघाने नथुराम व विखारी विचार सोडून संविधान व गांधी विचार स्विकारावा-सपकाळ

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या २ ऑक्टोबर जयंतीदिनी विजयादशमीला रा. स्व. संघाला १०० वर्ष पूर्ण होत असून हा नियतीचा एक संकेत आहे. १०० वर्ष पूर्ण करणाऱ्या रा.स्व संघाने आता तरी नथुराम व विखारी विचार सोडून समता, बंधुता व सामाजिक न्यायाचे संविधान व गांधी विचार स्विकारावे, असे आवाहन कॉँग्रेस प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.पत्रकार परीषदेत बोलताना सपकाळ म्हणाले की, भारताचे संविधान हे ऐतिहासिक घटना असून भारताची प्रेरणा आहे. संविधान हे मनुस्मृतीवर आधारीत असावे अशी रा.स्व.संघाची अपेक्षा होती, गोलवलर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना तसे पत्र पाठवले होते. पण आम्ही विशिष्ट लोक हा संघाचा विचार आहे तर संविधानाचा विचार हा आम्ही भारताचे लोक असा आहे. गोलवलकर यांचे बंच ऑफ थॉट हे रा. स्व. संघ व भाजपाचे बायबल आहे. संविधान नाकारणारा विचार भाजपचा आहे. स्वातंत्र्यानंतर पन्नास वर्ष रा. स्व. संघाने त्यांच्या कार्यालयावर राष्ट्रध्वज तिरंगा सुद्धा फडकवला नव्हता. आता शंभर वर्ष होताना संघाने विखारी व विषारी विचार सोडून संविधानाचा विचार स्विकारला पाहिजे असे सपकाळ म्हणाले. महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या पुढाकाराने २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान संविधान सत्याग्रह यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा नागपूरच्या दिक्षाभूमीपासून सुरु होऊन सेवाग्रामपर्यंत जाणार आहे. २८ तारखेला महान क्रांतीकारी भगतसिंह यांच्या बलिदानदिनी मशाल मोर्चा काढला जाणार आहे. तसेच नागपूरच्या संविधान चौकात एका सभेचे आयोजन करण्यात आले आहे. २९ तारखेपासून यात्रेला सुरुवात होणार आहे. यावेळी रा. स्व. संघाला संविधान



भेट देणार असल्याचेही कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. फडणवीस, निवडणूक आयोगाची दलाली बंद करा. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतचोरी झाल्याचे पुरावे दिले आहेत, मुख्यमंत्री फडणवीसांकडे गृहमंत्रालयही आहे, त्यांच्या पोलिसांनी राजुरा विधान सभेतील मतचोरी प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे तरिही देवेंद्र फडणवीस हे निवडणूक आयोगाची दलाली करत आहेत, त्यांनी ही दलाली बंद करावी. देवेंद्र फडणवीस हे चोर मुख्यमंत्री आहेत, असेही कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.राष्ट्रवादी कॉँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्याबद्दल भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या विधानावर बोलताना कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, पूर्वी सुसंस्कृत, सभ्य, विचारवंत व कवी पदरी असायचे पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही नालायक व विकृत लोक पदरी ठेवले आहेत. जयंत पाटील यांच्याबद्दल केलेले विधान हे बेलगामपणाचा कळस असून फडणवीस हे लाचार व अधर्मी मुख्यमंत्री आहेत असे सपकाळ म्हणाले.यावेळी पनवेलच्या भाजपा नगरसेवकांचा कॉँग्रेसमध्ये प्रवेश केला यामध्ये भाजपाचे माजी नगरसेवक हरिश केणी, रविकांत म्हात्रे, कैलास घरत यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह आज कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत कॉँग्रेस पक्षात प्रवेश केला. सपकाळ यांनी या सर्वांचे कॉँग्रेस पक्षात स्वागत केले.

# क्रिप्टोचा घातक शिरकाव

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पदभार स्वीकारून सहा महिने होताहेत तोच नानाविध पद्धतींनी त्यांनी अनेक प्रस्थापित आराखडे, संकल्पना तोडूनमोडून टाकल्या आहेत. त्यात आयात शुल्काचे युद्ध, जागतिक रखवालदाराच्या भूमिकेतून घेतलेली माघार, मित्रराष्ट्रांचा उघड अपमान किंवा हरित ऊर्जेच्या क्षेत्रात मारलेली कोलांटउडी अशा अनेक गोष्टींचा समावेश होईल. यामुळे ट्रम्प यांची क्रिप्टोकरन्सीच्या क्षेत्रातील घोडदौड काहीशी दुर्लक्षिली जात आहे. मात्र, क्रिप्टोच्या माध्यमातून ट्रम्प कुटुंबीयांनी अत्यल्प कालावधीत जमवलेली माया आणि त्यासाठी गेल्या सहा महिन्यात अमेरिकेची यासंदर्भातली बदलण्यात आलेली धोरणे ही चिंतेची गोष्ट आहे. या आधीच्या कार्यकाळात ट्रम्प यांनी क्रिप्टोकरन्सीला ‘महाघोटाळा’ म्हणून संबोधले होते; परंतु आता त्यांनी त्या घोटाळ्याचे महानायक बणण्याचे ठरवले की काय, अशी शंका येते. गेल्या वर्षी त्यांच्या कुटुंबीयांनी ‘वर्ल्ड लिबर्टी फायनान्शियल’ नावाची कंपनी काही संशयास्पद व्यक्तींच्या मदतीने स्थापन केली. त्यामार्फत ’ढळणचझ’सारखे ‘ मीम कॉईन ’ बाजारात आणून, त्याची भरपूर जाहिरात करून गुंतवणूकदारांना ट्रम्प यांना प्रत्यक्ष भेटण्याचा, सोबत भोजनाचा मान देण्यात आला.



याहूनही अधिक चिंतेची बाब म्हणजे, ट्रम्प यांच्या या क्रिप्टोकरन्सी संलग्नतांमुळे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात विदेशी शक्तींचा हस्तक्षेप होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचे प्रत्युत्तर पाकिस्तानला भारताने दिले, तेव्हा युद्धविरामानंतर ट्रम्प यांच्या फर्मने पाकिस्तान क्रिप्टो कौन्सिलशी भागीदारी केली, ज्यामध्ये उच्चपदस्थ पाकिस्तानी अधिकारी आणि लष्करी नेतृत्वाचाही समावेश होता. बदल्यात पाकिस्तानी लष्करप्रमुखाला थेट ‘व्हाइट हाऊस’मध्ये भोजनासाठी निमंत्रित करण्यात आले. जेव्हा अमेरिकेसारख्या देशाचे राजकीय नेतृत्व अशा अपारंपरिक आर्थिक साधनांमध्ये थेट हितसंबंध ठेवते, तेव्हा ‘क्रिप्टो-प्रेरित राजकारण’ उदयाला येऊ शकते, आणि ते भू-राजकीय स्थैर्यालाही आव्हान देऊ शकते.

अमेरिकेत अर्थातच यावरून मोठा वादंग निर्माण झाला आहे. डिजिटल मालमत्तेला अनुकूल कायदे मंजूर करणे, गृहकर्जासाठी राखीव मालमत्ता म्हणून मान्यता देणे किंवा अमेरिकन नागरिकांच्या निवृत्तीवेतनाच्या पोर्टफोलिओमध्ये त्यांचा समावेश करणे, तसेच आर्थिक नियमकांवर अनुकूल व्यक्तींची नेमणूक करून संशयित गुन्हेगारांविरुद्ध सुरू असलेल्या शोधमोहिमा थांबवणे यासारख्या अध्यक्षांच्या कृती वैयक्तिक आर्थिक लाभ मिळवण्यासाठीच्या आहेत, असा आरोप केला जात आहे. राष्ट्राध्यक्षांसारख्या उच्च पदावर असलेल्या व्यक्तीने, आपल्या अधिकाराचा वापर करून स्वतःच्या हिताची धोरणे आखणे, हे सार्वजनिक विश्वासाचा भंग करणारे कृत्य होय. एखाद्या राष्ट्राध्यक्षाने तेल उद्योगात स्वतःची प्रचंड गुंतवणूक असताना, तेल कंपन्यांना थेट फायदा होईल असे कायदे केले असते, तर समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटली असती; मात्र, क्रिप्टो करन्सीच्या अपारदर्शक स्वरूपामुळे, या कृतींना आर्थिक प्रगती’च्या नावाखाली झाकण्याचा प्रयत्न सुरू आहे.

आज अनेक जण या नव्या तंत्रज्ञानाकडे एक आर्थिक क्रांती म्हणून पाहत आहेत, मात्र त्यातील संभाव्य धोके प्रचंड आणि चिंताजनक आहेत. विशेषतः क्रिप्टोकरन्सी हे अंमली पदार्थांची तस्करी, शस्त्रास्त्रांची तस्करी, दहशतवादी आणि संघटित गुन्हेगारीसाठी मनी लाँडरिंगचे एक प्रमुख साधन बनले आहे. बेकायदा आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांसाठी डिजिटल मालमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. ट्रम्प प्रशासनाने मात्र अशा गैरव्यवहारांना आळा घालण्याऐवजी, क्रिप्टोकरन्सीला अधिकाधिक वापरकर्ते कसे मिळतील त्यासाठी प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली आहे. बेकायदा उद्योगांना लपवण्यासाठी क्रिप्टोकरन्सी अधिकाधिक उपयुक्त बनत जाणार. अशा धोरणांमुळे आर्थिक प्रणाली अस्थिर होऊन सट्टेबाजीचे बुडबुडे निर्माण होऊ शकतात, असा इशारा अर्थतज्ज्ञांनी दिला आहे.आर्थिक प्रणालींमधील अतिशिथिलता आणि त्यात गुंतलेले हितसंबंध या जोडगोळीमुळे २००८ मध्ये आधी अमेरिकेची आणि त्यामुळे संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था संकटात सापडली होती. आज पुन्हा त्याच धोक्याची चिन्हे दिसत आहेत. अमेरिकी राष्ट्राध्यक्षांच्या वैयक्तिक गुंतवणुकी, नियामक हस्तक्षेप आणि अपारदर्शक विदेशी संस्थांशी वाढते संबंध यामुळे डिजिटल मालमत्ता ही अमेरिकेच्या भविष्यातील आर्थिक अस्थिरतेचे कारण बनू शकते, आणि ते पूर्ण जगाचे अर्थकारण दूषित करून टाकू शकते. कठोर नियम आणि पारदर्शकतेअभावी, अनियंत्रित डिजिटल चलनांचा आणि अनिर्बंध राजकीय सत्तेचा संगम हा भ्रष्टाचार, भांडवलाची पळवापळवी आणि भू-राजकीय हेराफेरीला पोषक ठरू शकतो.

# राज्यात ६२ लाख एकर शेतीचे नुकसान ३० जिल्ह्यांमध्ये ओल्या दुष्काळाचा फटका

## शेतकऱ्यांना मदतीसाठी सरकार कटिबद्ध–कृषीमंत्री दत्तात्रय भरणे



**नागपूर (वृत्तसंस्था)**–ओला दुष्काळाच्या बाबतीत संपूर्ण परिस्थितीचा अंदाज घेतला जाईल. यानंतर राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री आणि आमच्या मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सदस्य त्यावर विचार करतील. हे सरकार शेतकऱ्यांचे सरकार आहे. आमचा बेसच शेतकरी आहे. ग्रामीण भागामध्ये जे शेतकरी अडचणीत आहेत त्यांना मदत करणे आणि पाठिंबा देणं आमचे कर्तव्य आहे, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी म्हटले आहे.दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यामध्ये आतापर्यंत एकूण ३० जिल्ह्यांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. साधारण १९५ तालुके बाधित झाले आहेत. तर ६५४ मंडळातील शेती पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यात प्राथमिक अंदाजानुसार ६२ लाख १७ हजार ५४० एकर शेती पिकाचे नुकसान झाले आहे.दत्तात्रय भरणे म्हणाले की, अतिवृष्टीच्या परिस्थितीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे या तिन्ही नेत्यांचे लक्ष आहे. त्यांनी आम्हाला सूचना दिला आहे त्यानुसार पालकमंत्री जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर जात पाहणी करत आहेत. ज्या ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यांचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून संपूर्ण नुकसान भरपाईच्या माध्यमामध्ये त्याला मदत केली जाईल.दत्तात्रय भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे ओला दुष्काळ जाहीर करण्यावर योग्य तो निर्णय घेतील. सरकारकडून जिथे जिथे नुकसान झाले तिथे तिथे पंचनामे करण्याचे काम खूप मोठ्या प्रमाणामध्ये महसूल विभाग आणि कृषी विभागाकडून मोठ्या प्रमाणामध्ये करत आहे.दत्तात्रय भरणे म्हणाले की, महायुती सरकार हे मराठा आणि ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही, जे योग्य आहे त्या प्रमाणे काम करेल. जयंत पाटील यांच्यावर आमदार गोपीचंद पडळकर यांनी टीका केली यावर बोलताना भरणे म्हणाले की, कुणीही कुणावर खालच्या पातळीवर टीका करणे योग्य नाही. तर दादा–ताई एकत्र या बॅनरवर मी ते अजून पाहिलेच नाही म्हणत त्यांनी बोलणं टाळलं आहे.



# ना.श्री.गणेशजी नाईक यांच्या वाढदिवसा निमित्त सेवाभावी १०० उपक्रमांचा पंधरवड्या





**मुंबई । प्रतिनिधी**

आदरणीय लोकनेते ना. श्री गणेशजी नाईक यांच्या वाढदिवसा निमित्त सेवाभावी १०० उपक्रमांचा पंधरवड्या तील राबविण्यात आलेल्या खालील कार्यक्रमांस आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून प्रसिद्धी देऊन सहकार्य करणेबाबत.'भारतीय जनता पक्षाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री तथा पालकमंत्री आदरणीय मा. ना. श्री. गणेशजी नाईक साहेब यांचा जन्मदिना निमित्ताने माजी विरोधी पक्ष नेते दशरथ भगत साहेब यांच्या संकल्पनेने तसेच युवा नेता श्री. निशांत भगत साहेब व समाजसेवक श्री. संदीप भगत साहेब यांच्या नेतृत्वाखाली विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक, धार्मिक व विविध सेवा प्रेरित उपक्रमांच्या एक व्यापक १०० उपक्रमांचा पंधरवडा आयोजित करण्यात आलेला आहे.आज सकाळच्या सत्रात नेरुळ सेक्टर १० येथील मातृसदन या निराश्रित जेष्ठ महिलांच्या वृद्धाश्रमात राज्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने केक कापण्यात येऊन सर्वांना संपूर्ण एकदिवसाचे अन्नदान करण्यात आले. यावेळी या वृद्धाश्रमातील सर्व जेष्ठ मातांचा व या संस्थेच्या कार्यकारी मंडळींचा सन्मान माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत व भाजपा युवानेते निशांत भगत यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह मिळून केला.दिवसभरात सानपाडा पामबीच विभागातील ति. शारदामाई धर्माधिकारी उद्यानातील विरंगुळा केंद्रात कॅरम स्पर्धेचे उदघाटन निशांत भगत व सोनखार जेष्ठ नागरीक संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. येथील माजी नगरसेविका श्रीमती फशीबाई करसन भगत यांच्या जनसंपर्क कार्यालयात जेष्ठ नागरिकांसाठी आयुष्यमान भारत योजनेच्या नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.दुपारच्या सत्रात निशांत भगत यांनी नागरिकांच्या शिष्टमंडळासह सानपाडा–पामबीच मधील मोराज रेसिडेन्सी समोरील चौकात होणाऱ्या वाहतूक कोंडी संदर्भात कायम स्वरूपी निवारण व त्यावरील उपायोजना यांची अंमलबजावनी करणे संदर्भातले निवेदन तुर्भे विभागीय वाहतूक पोलीस शाखेच्या व सानपाडा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांस देण्यात आले.

# ठाण्यात बांधकाम सुरू असलेल्या इमारती वरून पडून स्टोअर मॅनेजरचा मृत्यू



**ठाणे । प्रतिनिधी**

ठाण्यात बांधकाम सुरू असलेल्या इमारतीवरून पडून स्टोअर मॅनेजरचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. दुपारी ०२ : ३५ वाजता हायलँड हॉस्पिटल मागे, हायलँड पार्क, ढोकाळी, ठाणे (प.) या ठिकाणी हायलँड पार्क मधील बिल्डिंग नंबर २ (पी१+पी२+तळ+३२ मजली इमारत) या बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या सातव्या मजल्यावरून श्री. सचिन वसंत गुंडेकर (वय–४९ वर्षे, राहणार:– श्रीकृपा सोसायटी नंबर १, सर्वोदया नगर, गव्हाणी पाडा, नाहूर रोड मुलुंड.) पडून तळ मजल्यावरती असलेल्या लोखंडी परांची व दोरखंडमध्ये अडकले होते. सदर घटनास्थळी बाळकुम अग्निशमन केंद्राचे स्थानक अधिकारी श्री. वेताळ, कापूरबावडी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१– पिकअप वाहनासह, अग्निशमन दलाचे जवान १ इमर्जन्सी वाहनासह व ०१– रुग्णवाहिका उपस्थित होते. सदर इमारतीवरून पडलेली व्यक्तीही सिद्धी ग्रुप इंटरप्राईजेस या कंपनीचे स्टोअर मॅनेजर म्हणून सदर ठिकाणी काम करत होती.सदर घटनास्थळी इमारतीवरून पडलेल्या व्यक्तीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने सदर व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला होता. सदर व्यक्तीला अग्निशमन दलाचे जवान व आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी बाहेर काढून कापूरबावडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर व्यक्तीचा मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी सिव्हिल रुग्णालय, ठाणे येथे दाखल केले आहे.

# ठाण्यात पथविक्रेत्यांसाठी लोक कल्याण मेळाव्यांचे आयोजन

## ठाणे महापालिका आणि स्टेट बँक यांचा संयुक्त उपक्रम

**ठाणे । प्रतिनिधी**

गृह निर्माण व शहरी कार्य मंत्रालय व नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या निर्देशानुसार पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (झच् डत–छळवहळ) योजनेंतर्गत १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत लोक कल्याण मेळावा ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने आयुक्त सौरभ राव यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली १७ सप्टेंबर २०२५ पासून भारतीय स्टेट बैंक ऑफ इंडिया यांच्या समन्वयाने 'लोक कल्याण मेळाव्याचे' आयोजन ठाणे महापालिका प्रभाग समिती क्षेत्रात सुरू करण्यात आले आहे. सदर मेळाव्यामध्ये पथविक्रेत्यांचे नवीन अर्ज भरणे, मंजूर झालेल्या कर्ज प्रकरणांना कर्ज वितरित करणे व त्यांना डिजीटल व्यवहाराबावत माहिती देण्यात येत आहे. लोक कल्याण मेळावा २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत विविध बँकासोबत राविण्यात येणार आहे. या योजनेमध्ये पथविक्रेत्यांना सहाय्य म्हणून खेळते भांडवल प्रथम कर्ज रू १५,०००/– द्वितीय कर्ज रू.



२५,०००/– व तृतीय कर्ज रू. ५०,०००/– कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देणे, बँकेकडे प्रलंबित असलेले कर्ज प्रकरण निकाली काढणे, नियमित परतफेड करण्यास प्रोत्साहन देणे, डिजीटल व्यवहारास प्रोत्साहन देणे, योजनेचा लाभ घेणाऱ्या आणि वेळेवर हफ्ता परत करणाऱ्या फेरीवाल्यांना युपीआय लिंक्ड क्रेडीट कार्ड उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजने अंतर्गत फेरीवाल्यांना डिजिटल व्यवहारांवर १,६०० रुपयांपर्यंत कॅशबॅक मिळणार आहे. पथविक्रेत्यांचे सामाजिक – आर्थिक सर्वेक्षण करून ८ योजनांचा लाभ देण्यात येणार आहे तसेच अन्न पदार्थ विक्री करणा–या पर्यावक्रेत्यांना ऋडड–ख मार्फत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. अशा प्रकारचे लोक कल्याण मेळावे इतर बँकांना आयोजित करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. केंद्र शासनाने पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी या योजनेचा कर्ज कालावधी ३१ मार्च २०३० पर्यंत वाढवला आहे. या योजनेचा लाभ घेणेकरिता नजीकच्या सेवा केंद्राशी संपर्क करून अर्ज करावा. त्याबाबतच्या अधिक माहितीसाठी समाज विकास विभाग, ठाणे महानगरपालिका येथे संपर्क करावा. या मेळाव्याच्या निमित्ताने पथविक्रेते, फेरीवाले किरकोळ विक्रेते, हातगाडीधारक व छोटे उद्योजक यांनी झचडत–छळवहळ या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन उपायुक्त (समाजविकास विभाग) अनघा कदम यांनी केले आहे.

# जागतिक स्मृतिभ्रंश दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

**मुंबई । प्रतिनिधी**

अल्झायमर डिसीज इंटरनॅशनल (ADI) संस्थेने १९९४ मध्ये २१ सप्टेंबर हा जागतिक स्मृतिभ्रंश दिवस म्हणून जाहीर केला. यानिमित्ताने समाजात स्मृतिभ्रंश (Dementia/Alzheimer's) बद्दल जनजागृती व्हावी, यासाठी आजी केअर सेवक फाउंडेशन आणि ज्येष्ठ नागरिक संघ, बांगुर नगर, गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी एका विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार, दिनांक १९ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते.

या कार्यक्रमात बोलताना आजी केअर सेवक फाउंडेशनचे सी.ई.ओ. श्री. प्रकाश नारायण बोरगांवकर यांनी सांगितले की, जगभरात दरवर्षी सुमारे १ कोटी नवीन स्मृतिभ्रंशाच्या केसेस समोर येतात आणि स्मृतिभ्रंश हे मृत्यूचे सातवे प्रमुख कारण आहे. भारतात २०१० मध्ये ३७ लाख स्मृतिभ्रंशग्रस्त लोक होते, ही संख्या आता ८८ लाखांवर पोहोचली असून, २०३६ पर्यंत ती १.७ कोटींवर जाण्याची शक्यता आहे. जनजागृतीचा अभाव आणि अपुऱ्या आरोग्य सुविधांमुळे स्मृतिभ्रंशाच्या उपचारांचा खर्च वाढत आहे.श्री. बोरगांवकर



यांनी स्मृतिभ्रंशाची जोखीम घटक (Risk Factors) स्पष्ट करताना सांगितले की, वाढते वय, उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा, अतिमद्यपान, एकटेपणा आणि नैराश्य यामुळे स्मृतिभ्रंशाचा धोका वाढतो. या घटकांवर वेळीच नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. तसेच, नुकत्याच घडलेल्या गोष्टी विसरणे, वस्तू चुकीच्या ठिकाणी ठेवून विसरणे, मूड आणि वर्तनात बदल, बोलताना गोंधळ होणे ही स्मृतिभ्रंशाची प्रारंभिक लक्षणे आहेत. ही लक्षणे वेळीच ओळखून उपचार घ्यावेत, असे त्यांनी सुचवले.स्मृतिभ्रंश टाळण्यासाठी दररोज शारीरिक आणि मेंदूचा व्यायाम, सुडोकू, शब्दकोडे सोडवणे, नवीन गोष्टी शिकणे, छंद जोपासणे आणि मोकळेपणाने संवाद साधणे यासारख्या सवयी आत्मसात कराव्यात, असेही त्यांनी नमूद केले.आजी केअरच्या क्लिनिकल सायकोलॉजिस्ट नैना ओक यांनी 'ब्रेन जिम' ही संकल्पना उपस्थितांना समजावून सांगितली आणि प्रत्यक्ष ब्रेन एक्सरसाइज करून दाखवले. मानसिकदृष्ट्या कणखर राहण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला उपस्थित सर्वांना हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी आणि उपयुक्त वाटला.

# कर्जतमध्ये खड्ड्यांच्या निषेधार्थ मनसेचे भीक मागो आंदोलन!

**कर्जत । प्रतिनिधी**

खड्ड्यात पडून जर साधा कर्जतकर अपघातग्रस्त झाला, तर जबाबदार कोण? अधिकारी की ठेकेदार? की मौन बाळगणारे लोकप्रतिनिधी? – असा थेट सवाल करत मनसे रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी प्रशासनाला जागेवर आणले.कर्जत तालुक्यातील खड्डेमय रस्त्यांच्या निषेधार्थ आज शुक्रवार १९ सप्टेंबर रोजी मनसेने नेरळ व कर्जत शहरात भिक मागो आंदोलन करून प्रशासनाचा खरपूस समाचार घेतला. या आंदोलनाने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडवून दिली.

सकाळी नेरळ साई मंदिर चौकात आणि दुपारी कर्जत टिळक चौकात हजारो नागरिकांच्या उपस्थितीत मनसे कार्यकर्त्यांनी रस्ते खड्डेमुक्त करा, भ्रष्ट अधिकाऱ्यांना जाब द्या अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. स्थानिक नागरिकांनीही प्रशासनाच्या भाकरीवर भाष्य करत खिशातील पैसे काढून मनसेच्या भिक मागो आंदोलनात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.या आंदोलनाला शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस तसेच स्थानिक







संघटनांचा पाठिंबा मिळाला. मनसे कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून खड्ड्यांतून मोर्चा काढला आणि प्रशासनाचे डोळे उघडले.दरम्यान पोलिस बंदोबस्तात झालेल्या या आंदोलनामुळे अधिकारी वर्ग दडपणाखाली आला. अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग, MSRDC, MMRDA आणि जिल्हा परिषदेच्या अधिकार्यांनी समोर येऊन एका महिन्यात तालुका खड्डेमुक्त करू असे आश्वासन दिले. तात्काळ काही रस्त्यांवरील खड्डे बुजवण्यासही सुरुवात करण्यात आली.मनसेने आंदोलना दरम्यान जमवलेली १२४० रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीत ऑनलाईन जमा करून प्रशासनाला तीव्र संदेश दिला – जनतेकडून भिक मागूनही आम्ही खड्डे बुजवू, पण तुमचा भ्रष्टाचार सोडणार नाही.जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी स्पष्ट इशारा दिला – ठेकेदारांना काळ्या यादीत टाका, एका महिन्यात खड्डेमुक्त रस्ते नसल्यास मनसे पुन्हा रस्त्यावर उतरेल,आंदोलन यापेक्षा तीव्र होईल म्हणून इशारा दिला.यावेळी नेरळ व कर्जत मधील आंदोलनात जिल्हा सचिव अक्षय महाले, तालुकाध्यक्ष यशवंत भवारे, तालुका सचिव प्रदीप पाटील, उपतालुकाध्यक्ष स्वप्नील शेळके, प्रविण राणे, नारायण भोईर, भूषण राणे, सागर भोईर, प्रसिद्धीप्रमुख अवधुत अत्रे, कर्जत शहराध्यक्ष राजेश साळुंखे, नेरळ शहराध्यक्ष सुभाष नाईक, महिला शहराध्यक्षा तेजश्री भोईर यांच्यासह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# राष्ट्रसंत श्री भगवानबाबा यांच्या जयंती निमित्त पाटोद्यात ठेवलेल्या शिवमहापुराण कथेला प्रचंड गर्दी







**पाटोदा | प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे म्हणजे गेल्या १४ वर्षांपासून राष्ट्रसंत श्री भगवानबाबा यांच्या जयंतीचे पाटोदा तालुका राष्ट्रसंत श्री भगवानबाबा जयंती उत्सव समितीच्या वतीने दरवर्षी मोठ्या उत्साहात जयंती साजरी केली जाते मात्र या वर्षी दिनांक १५/९/२०२५ ते २१/९/२०२५ पर्यंत दुपारी ४ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत श्री समाधान महाराज शर्मा यांच्या शिवमहापुराण कथेचे आयोजन समितीचे केले असुन या शिवमहापुराण कथेला प्रचंड प्रमाणात गर्दी होत असुन पाटोदा सह संपूर्ण तालुक्यातून महीला भगिनी व नागरिक मंडळी येत असुन या शिवमहापुराण कथेचा लाभ घेत आहेत असुन या महाशिवपुराण कथेचे आयोजन खुपच सुंदर केले असल्याचे राष्ट्रसंत श्री भगवानबाबा जयंती उत्सव समितीचे सर्वत्र कौतुक होत आहे. कथा सांगताना श्री समाधान महाराज शर्मा म्हणाले की शिवमहापुराण कथा आत्मशांती,धर्म जागृती आणि समाजोन्नतीचा महामार्ग आहे.या कथेतील प्रत्येक प्रसंग जीवनाला योग्य दिशा देणारा आहे.भगवान शंकराची उपासना केवळ वैयक्तिक कल्याणासाठी नसून, संपूर्ण समाजाच्या मंगलासाठी आहे. राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे कार्य त्याच अध्यात्मिक तत्त्वज्ञानाशी जोडलेले आहे.त्यांनी सदैव समाजातील दुर्बल, वंचित,पीडित वर्गासाठी आपल्या आयुष्याची आहुती दिली.त्यांचे स्मरण म्हणजे सेवाभाव, करुणा आणि एकतेचा दीप प्रज्वलित ठेवणे होय असे प्रतिपादन समाधान महाराज शर्मा यांनी केले. या सोहळ्यासाठी ९० बाय २०० फूटांचा विशाल वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात आला आहे. शेवटच्या दिवशी म्हणजे २१ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता पाटोदा शहरातून निघणारी भव्य शोभायात्रा विशेष आकर्षण असणार आहे. ढोल-ताशांचा गजर, लेझीम पथक,झांज पथक आणि आकर्षक रथांमधून निघणारी ही शोभायात्रा हजारो भक्तांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. त्यानंतर शिवमहापुराण कथेची सांगता व महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होईल. भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये याची काळजी आयोजक राष्ट्रसंत श्री भगवानबाबा जयंती उत्सव समितीच्या वतीने घेण्यात येत आहे. शहरभर उभारलेल्या स्वागत कमानी, प्रकाशमाळा आणि धार्मिक घोषवाक्यांनी सजलेले रस्ते पाटोदा नगरीत भक्तिमय वातावरण अधिकच खुलून दिसत आहे. दररोज हजारो भाविकांसाठी बसण्याची सोय करण्यात आली आहे. कथा संपल्यानंतर महाप्रसाद दररोज होत आहे.महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र सोयी करण्यात आली आहे.आयोजकांनी भाविकांच्या सेवेसाठी पाणी,वैद्यकीय सुविधा आणि स्वयंसेवकांची व्यवस्था केली आहे.समाजातील विषमता, अन्याय आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी आयुष्यभर लढा दिला,' असे प्रवचन आपल्या रसाळ वाणीत सादर केले. यावेळी श्रीक्षेत्र संत मीराबाई संस्थान महासांगवीचे मठाधिपती महंत राधाताई महाराज आईसाहेब, रामकृष्ण इंघवे बापू महाराज, सत्यभामा बांगर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उत्सवाने पाटोदा नगरीत केवळ धार्मिकता नव्हे तर एकता, बंधुभाव आणि समाजकारणाचे अद्वितीय उदाहरण उभे केले आहे. राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या कार्याची प्रेरणा आणि शिवमहापुराण कथेतील दिव्य संदेश, या दोन्हींचा संगम भाविकांना अध्यात्मिक उन्नतीकडे नेणारा ठरत आहे.

# औसा तालुक्यात अतिवृष्टीने खरीप पिके धोक्यात!

## शेतकऱ्यांचे आर्थिक संकट गडद, शासनाच्या मदतीची तातडीची गरज

**औसा | प्रतिनिधि**

लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यात मागील काही दिवसांपासून मुसळधार पावसाचा तडाखा बसत आहे. या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील सोयाबीन, तूर, उडीद, मका, कापूस आणि ज्वारी यांसारख्या महत्त्वाच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतात पाणी साचल्याने रोपे मरू लागली असून, उगवण टप्प्यातील पिके पूर्णपणे बाधित झाली आहेत. काही भागांमध्ये तर पेरणीच वाहून गेली आहे. औसा तालुक्यात दरवर्षी पावसाचे प्रमाण अनियमित असते. काहीवेळा दुष्काळ, तर काहीवेळा अतिवृष्टी अशा दोन टोकाच्या परिस्थितींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते. यावर्षी पावसाचा अतिरेक झाल्याने शेतकरी पाणीटंचाईपासून पाणीपुरवठ्याच्या संकटापर्यंत या टोकाच्या आव्हानाला तोंड देत आहेत. कपाशीच्या शेतात पाणी साचल्याने मुळकुज होण्याची शक्यता वाढली आहे.

डाळींच्या पिकांमध्ये किडी व रोगांचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे.

जमिनीत ओलावा जास्त झाल्याने शेतात पुन्हा पेरणी करणे अवघड होत आहे.

**शेतकऱ्यांची आर्थिक अडचण**

बहुतांश शेतकऱ्यांनी बियाणे, खत, औषधे आणि मजुरीसाठी बँका किंवा खासगी सावकारांकडून कर्ज घेतले आहे.

पिकांचे नुकसान झाल्यामुळे उत्पन्नाचे साधनच हाती न उरल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

कर्ज फेडणे, घरखर्च भागवणे आणि पुढच्या हंगामासाठी तयारी करणे या तिहेरी संकटात शेतकरी सापडले आहेत.

अनेक शेतकऱ्यांना जमीन तारण ठेवून कर्ज घ्यावे लागले होते, ते परतफेड करण्याची वेळ आणखी कठीण झाली आहे.

**वरील सर्व गोष्टी चे शासनाने पाठपुरावा करून पावले उचलावीत?**

१.नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा तात्काळ पंचनामा करून त्यांना योग्य नुकसानभरपाई देणे.

२.पीकविमा योजनेतील दावे लवकरात लवकर निकाली काढणे.

३.शेतकऱ्यांना बिनव्याजी व दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देणे.

४.खतं, बियाणं आणि इंधनावर अनुदान वाढवून शेतकऱ्यांचा भार हलका करणे.

५.कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी विशेष मार्गदर्शन मोहीम हाती घ्यावी.

६.हवामान बदलाचा विचार करून दीर्घकालीन सिंचन व जलनिस्सारण योजना राबविणे.

**शेतकऱ्यांनी पुढील हंगामासाठी हे करावे?**

१.शेतात निचऱ्याची सोय करून अतिरिक्त पाणी लवकर बाहेर पडेल अशी व्यवस्था करावी.

२.केवळ एका पिकावर अवलंबून न राहता बहुपिक पद्धत (Mixed Cropping) स्वीकारावी.

३.अल्पकालीन आणि हवामानाला अनुरूप पिके घ्यावीत, ज्यामुळे नुकसानाचा धोका कमी होईल.

४.सेंद्रिय व कमी खर्चिक शेती पद्धती आत्मसात कराव्यात.

५.हवामान बदल लक्षात घेऊन ड्रिप सिंचन, स्प्रिंकलर यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा.

६.प्रत्येक हंगामात पीकविमा योजना घेणे बंधनकारक करावे.

७.शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेतकरी उत्पादक कंपनी (FPO) किंवा सहकारी संस्था तयार कराव्यात, जेणेकरून बाजारभावाचा फायदा मिळू शकेल.

औसा तालुक्यातील ही परिस्थिती केवळ स्थानिक पातळीवर मर्यादित नाही. संपूर्ण मराठवाड्यात पावसाच्या अनियमिततेमुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांचे भविष्य असुरक्षित बनले आहे. हवामान बदलाचे हे आव्हान ओळखून शासनाने तात्काळ आणि दीर्घकालीन योजना राबविणे गरजेचे आहे.

# ठेकेदाराच्या निकृष्ट कामामुळे राजेगाव-खानवटे रस्ता उध्वस्त

## रस्त्याच्या दुरवस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष; ग्रामस्थ संतप्त



**दौंड | प्रतिनिधी**

राजेगाव ते खानवटे हा महत्त्वाचा मार्ग गेल्या काही महिन्यांपासून खड्डेमय झाला असून ग्रामस्थांच्या हालअपेष्टा वाढल्या आहेत. विशेषतः राजेगाव फार्म, जगताप-गायकवाड वस्ती शेजारील ओढा परिसर धोकादायक बनला आहे. येथे सुरक्षित भिंतीला मोठा भगदाड पडल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

रस्त्यावरील मोठमोठे खड्डे व उखडलेला डांबर यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. दररोज शालेय विद्यार्थी, शेतकरी व प्रवासी या मार्गाचा वापर करतात; मात्र प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याची नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.ग्रामस्थांचा आरोप आहे की, हा रस्ता पूर्वी चांगल्या अवस्थेत होता; परंतु ठेकेदाराकडे दुरुस्तीचे काम सोपविल्यानंतरच तो उध्वस्त झाला. ठेकेदाराने काम अपूर्ण सोडल्याने रस्त्याची आणखी दुरवस्था झाली आहे. त्यामुळे ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करून तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.याबाबत वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, रस्ता तातडीने दुरुस्त न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

# जिल्हास्तरीय 'अविष्कार' स्पर्धेत तुलसी महाविद्यालयास तृतीय पारितोषिक




**बीड | प्रतिनिधी**


विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत दरवर्षी 'अविष्कार' स्पर्धा आयोजित केली जाते. यंदाची जिल्हास्तरीय स्पर्धा गुरुवारी (दि.१८) स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय, बीड येथे उत्साहात पार पडली. जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांनी आपले प्रकल्प सादर केले. त्यात तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथील बी.सी.एस. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी राहीन आजू पठाण हिने सादर केलेला 'स्मार्ट फायर अलर्ट सिस्टीम' हा प्रकल्प सादर करून तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.राहीन आता विद्यापीठस्तरीय 'अविष्कार' स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणार आहे. तिच्या या यशामुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.या यशाबद्दल तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे, समन्वयक प्रा. समिर मिर्झा यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी राहीनचे अभिनंदन करून पुढील संशोधन प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.


# शेतकऱ्यांना सरसकट भरपाई द्या:पालकमंत्री जयकुमार गोरे



**अक्कलकोट (वृत्तसंस्था)**-अतिवृष्टीमुळे शेतकरी चिंतेत असून मी आधार देण्यासाठी आलो. तालुक्यात सरसकट पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत, असे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. त्यांनी अक्कलकोट तालुक्यात अतिवृष्टीमुळे पिकांच्या नुकसानीची पाहणी केली.जयकुमार गोरे व आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रमुख अधिकाऱ्यांसोबत तालुक्यातील बादोले, बोरगाव (दे), शिरसी, बोरी, उमरगे या ठिकाणी पाहणी केली. सांगवी येथे शेतकरी, ग्रामस्थ उभे होते. पालकमंत्री व आमदारांनी ताफा थांबवून त्यांच्या व्यथा जाणून घेतली. अतिवृष्टीने तालुक्यातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. सचिन कल्याणशेट्टी म्हणाले तालुक्यात प्रचंड नुकसान झाले. मुख्यमंत्र्यांनी सर्व पालकमंत्र्यांना आदेश देत पाहणी करण्यास सांगितले. पालकमंत्री गोरे यांनी स्वतः नुकसान पाहिले. शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची आम्ही काळजी घेत आहोत. असे बोलून त्यांच्या वेदना जाणून घेत मदतीचे आश्वासन दिले.

# कराळे कुटूंबासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते नरेश जोशी यांच्याकडून एक लाख रुपयांची मदत जाहीर





**कर्जत | प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आंबिवली गावामधील एका घराला भीषण आग लागली होती या आगीमध्ये कराळे कुटुंबीयांचं खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यांच्या मदतीसाठी नरेश जोशी हे पुढे सरसावले असून त्यांना तात्काळ एक लाखाची मदत करणार असल्याचे जाहीर केले आहे.

ही मदत त्या कराळे कुटुंबासाठी मोलाची ठरणार आहे. जोशी यांना ही घटना कळता क्षणी त्यांनी सर्व घटनेची माहिती घेतली. दरम्यान या कुटुंबावर आलेले संकट कसे दूर होईल याकरिता त्यांनी प्रयत्न केला, ही घटना कर्जत तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत माणगांव तर्फे वरेडी हद्दीतील आंबिवली गावातील जगदीश कराळे यांच्या घराला पहाटेच्या वेळी भीषण आग लागली होती. दरम्यान या आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून या आगीमध्ये कोणत्याही प्रकारची जीवित हानी झालेली नाही. ही आग विझवण्यासाठी आंबिवली गावातील स्थानिक नागरिकांनी तात्काळ तत्परता दाखवत या आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला परंतु ही आग इतकी भयंकर होती की या आगीमध्ये घरातील सर्व वस्तू जळून खाक झाल्या आहेत तसेच या आगीच्या ज्वालांमध्ये घराचे पत्रे देखील फुटले आहेत. या आगीमुळे जगदीश कराळे यांच्या घराचे खूप मोठे नुकसान झाले आहे. या सर्व घटनेचा गांभीर्याने विचार करत नरेश जोशी यांनी मदतीचा हात पुढे करत या कुटुंबाला एक अशाच किरण दाखवला आहे.या मदतीमुळे त्या कुटुंबावर आलेल्या संकट दूर होण्यास मदत मिळणार आहे. नरेश जोशी हे आंबिवली गावातील रहिवासी असल्याने त्यांना गावावर आलेल्या संकट अथवा गावातील व्यक्तीवर आलेलं संकट हे आपलं वाटत असते त्याच अनुषंगाने आज त्यांनी या कुटुंबासाठी तात्काळ एक लाखाची मदत देण्याचं जाहीर केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077